# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह

**विशेष महासभा दि. २८/०८/२०१२**

आज मंगळवार दि. २८/०८/२०१२ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. विशेष महासभा सकाळी ११.०० वाजता सभा सुचना क्र. १ दि. १७/०८/२०१२ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह येथे मा. पिठासीन अधिकारी, श्री. शिवाजीराव दौंड, अप्पर आयुक्त, कोकण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | सँन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | सदस्या |
| २) | अशोक सुर्यदेव तिवारी | सदस्य |
| ३) | असेन्ला मेंडोन्सा परेरा | सदस्या |
| ४) | ॲड. रवि व्यास | सदस्य |
| ५) | कोठारी सुमन रमेश | सदस्या |
| ६) | कांगणे यशवंत धगाजी | सदस्य |
| ७) | मयेकर सरस्वती रजनीकांत | सदस्या |
| ८) | सिंग मदन उदितनारायण | सदस्य |
| ९) | पाटील रोहिदास शंकर | सदस्य |
| १०) | म्हात्रे कल्पना महेश | सदस्या |
| ११) | पिसाळ मनिषा नामदेव | सदस्या |
| १२) | पांडे हंसूकुमार कमलकुमार | सदस्य |
| १३) | निलम हरिश्चंद्र ढवण | सदस्या |
| १४) | जाधव मोहन महादेव | सदस्य |
| १५) | पाटील सुनिता कैलास | सदस्या |
| १६) | वेतोसकर राजेश शंकर | सदस्य |
| १७) | अरविंद दत्ताराम ठाकुर | सदस्य |
| १८) | प्रभात प्रकाश पाटील | सदस्या |
| १९) | प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| २०) | शर्मा सुनिला सत्येंद्र | सदस्या |
| २१) | मेहता डिंपल विनोद | सदस्या |
| २२) | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | सदस्य |
| २३) | संध्या प्रफुल्ल पाटील | सदस्या |
| २४) | पाटील वंदना विकास | सदस्या |
| २५) | प्रविण मोरेश्वर पाटील | सदस्य |
| २६) | घरत तारा विनायक | सदस्या |
| २७) | आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र | सदस्य |
| २८) | केळुसकर प्रशांत नारायण | सदस्य |
| २९) | भानुशाली वर्षा गिरीधर | सदस्या |
| ३०) | पाटील वंदना मंगेश | सदस्या |
| ३१) | मुन्ना सिंग | सदस्य |
| ३२) | रावल भगवती जयशंकर | सदस्या |
| ३३) | शाह राकेश रतिशचंद्र | सदस्य |
| ३४) | शरद केशव पाटील | सदस्य |
| ३५) | मेघना दिपक रावल | सदस्या |
| ३६) | पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | सदस्य |
| ३७) | जैन गिता भरत | सदस्या |
| ३८) | जैन रमेश धरमचंद | सदस्य |
| ३९) | शुभांगी महिन कोटियन | सदस्या |

| | | |
|---|---|---|
| ४०) | डॉ. राजेंद्र जैन | सदस्य |
| ४१) | मेंन्डोंसा स्टिवन जॉन | सदस्य |
| ४२) | तांगडे प्रतिभा प्रकाश | सदस्या |
| ४३) | रॉड्रीक्स मॉरस जोसेफ | सदस्य |
| ४४) | ग्रिटा स्टिफन फॅरो | सदस्या |
| ४५) | डॉ. आसिफ गुलाब शेख | सदस्य |
| ४६) | जयमाला किशोर पाटील | सदस्या |
| ४७) | संदिप मोहन पाटील | सदस्य |
| ४८) | गोविंद हेलन जॉर्जी | सदस्या |
| ४९) | डिमेलो बर्नट अल्बर्ट | सदस्य |
| ५०) | बगाजी शर्मिला विन्सन | सदस्या |
| ५१) | लियाकत ग. शेख | सदस्य |
| ५२) | परमार अनिता भरत | सदस्या |
| ५३) | पाटील प्रणाली संदिप | सदस्या |
| ५४) | रकवी सुहास माधवराव | सदस्य |
| ५५) | झिनत रऊफ कुरेशी | सदस्या |
| ५६) | कॅटलीन ऍन्थोनी परेरा | सदस्या |
| ५७) | खण्डेलवाल सुरेश | सदस्य |
| ५८) | पाटील नरेश तुकाराम | सदस्य |
| ५९) | शेख शबनम लियाकत | सदस्या |
| ६०) | सुजाता रविकांत शिंदे | सदस्या |
| ६१) | मेहता नरेंद्र लालचंद | सदस्य |
| ६२) | मोहम्मद फरिद सिद्दीक कुरेशी | सदस्य |
| ६३) | पुजारी कांचना शेखर | सदस्या |
| ६४) | काझी रशीदा जमील | सदस्या |
| ६५) | इनामदार जुबेर | सदस्य |
| ६६) | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | सदस्य |
| ६७) | सय्यद नुरजहाँ नझर हुसेन | सदस्या |
| ६८) | म्हात्रे सुर्यकांत खंडोजी | सदस्य |
| ६९) | डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| ७०) | जैन सिमा महेंद्र | सदस्या |
| ७१) | कासोदरिया अश्विन श्यामजी | सदस्य |
| ७२) | डॉ. नयना मनोज वसानी | सदस्या |
| ७३) | जैन दिनेश तेजराज | सदस्य |
| ७४) | भट्ट दिप्ती शेखर | सदस्या |
| ७५) | दळवी प्रशांत ज्ञानदेव | सदस्य |
| ७६) | विराणी रेखा अनिल | सदस्या |
| ७७) | सामंत प्रमोद जयराम | सदस्य |
| ७८) | अनिता जयवंत पाटील | सदस्या |
| ७९) | म्हात्रे परशुराम पद्माकर | सदस्य |
| ८०) | भोईर भावना राजू | सदस्या |
| ८१) | भोईर राजू यशवंत | सदस्य |
| ८२) | वेंचर गिल्बर्ट मेंन्डोंसा | सदस्य |
| ८३) | अरोरा दिपिका पंकज | सदस्या |
| ८४) | भावसार शिल्पा कमलेश | सदस्या |
| ८५) | वंदना रामदास चक्रे | सदस्या |
| ८६) | कमलेश यशवंत भोईर | सदस्य |
| ८७) | सुमबंड महरून्नीसा हारूनरशीद | सदस्या |
| ८८) | गावंड मंदाकिनी आत्माराम | सदस्या |
| ८९) | प्रभाकर पद्माकर म्हात्रे | सदस्य |
| ९०) | मीरादेवी रामलाल यादव | सदस्या |
| ९१) | अनिल बाबुराव भोसले | सदस्य |
| ९२) | रविंद्र भिमदेव माळी | सदस्य |

९३)	दक्षता राजेंद्र ठाकूर	सदस्या

**<u>गैरहजर सदस्य – निरंक</u>**

**<u>रजेचा अर्ज – निरंक</u>**

**शिवाजीराव दौंड ( पिठासीन अधिकारी) :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेतील सर्व सन्माननिय सदस्य यांचे ह्या ठिकाणी महासभेत स्वागत करीत आहे. माझे नाव श्री. शिवाजीराव दौंड मी अप्पर आयुक्त कोकण विभाग आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अन्वये १९४९ प्रकरण २ कलम १९(१) अधिनियम तरतुद केल्याप्रमाणे महापौर पदावर महानगरपालिका नगरसेवकांपैकी एक सन्माननिय नगरसेवकांची निवड करणे हा एक विषय आजच्या विशेष महासभेचा आहे. नविन महापौर अडीच वर्षाच्या कालावधीसाठी पद धारण करतील मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ महापौर व उपमहापौर ह्या पदासाठी निवडणुक घेणे सुधारणा अधिसुचना नियम २००६ मधील नियम ५ नुसार मा. महापौरांची अथवा मा. उपमहापौरांची निवडणुक करण्यासाठी बोलविलेल्या विशेष बैठकीच्या अध्यक्ष स्थानी विभागीय आयुक्त अथवा त्यांचे प्रतिनिधी असेल अशी तरतुद आहे. तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती इतर समिती यांची निवडणुक घेणे. नियम २००७ मधील नियम (२) मधील शासन अधिसुचना १२/१२/२००८ नुसार मा. विभागीय आयुक्त यांनी १६/०८/२०१२ च्या आदेशांव्ये सदर निवडणुकीसाठी मला पिठासीन अधिकारी म्हणून प्राधिकृत केले आहे. तर या महापालिकेचे कामकाज सुरु करण्यात येत आहे.

**प्र. नगरसचिव :-**

सर्व सन्मा. सदस्यांचे महापालिका प्रशासनाच्या वतीने हार्दिक स्वागत करुन मा. पिठासीन अधिकारी यांच्या मान्यतेने मा. महापौर निवडणुकीच्या कामकाजास सुरुवात करीत आहे.

**नरेंद्र मेहता :-**

सचिव साहेब, प्रक्रिया सुरु करण्यापूर्वी पिठासीन अधिकारी महोदय, या मिरा भाईंदर महानगरपालिकेची आज मा. महापौर यांची आज निवडणुक आहे आणि सर्व नगरसेवक या ठिकाणी उपस्थित आहेत. सर्वात प्रथम सर्वांचे अभिनंदन करतो. मी आपल्याकडे एक जागा एक नगरसेवक जी निवडणुक झाली त्याचा अजुनही निकाल घोषित झालेला नाही. सुप्रिम कोर्टाचा त्याच्यामध्ये आदेश झालेला आहे. आता एक नगरसेवकांचा निर्णय प्रलंबित असताना ही आपण निवडणुक प्रक्रिया सुरु करतो ती लिगली धरली जाईल का? आणि हे कुठल्या कायद्याने? कारण की ह्या लोकशाही देशात प्रत्येक व्यक्तीला मतदान करण्याचा अधिकार आहे आणि त्या नगरसेवकांना मतदानापासून वंचित करुन ही निवडणुक घेणे योग्य राहील का? ह्याचा आपण खुलासा करावा.

**आसिफ शेख :-**

सन्मा. पिठासीन अधिकारी साहेब, सर्वोच्च न्यायालयात एका प्रभागातील निर्णय प्रलंबित आहे. परंतु, सर्वोच्च न्यायालयाने असा कोणताही निर्देश किंवा आदेश महापालिका प्रशासनास किंबहूना निवडणुक आयुक्तांना दिलेला नाही ही आजची जी महापौर/उपमहापौर निवडणुक आहे. ती कुठेतरी स्थगित करावी. तर सन्मा. ते माजी महापौर राहीलेले आहेत त्यांना ज्ञान जास्त आहे. आणि महापालिका संपूर्ण निवडणुक प्रक्रिया एकदा सुरु झाल्यानंतर त्याठिकाणी त्यामध्ये कोणताही हस्तक्षेप किंबहुना न्यायालय पण करीत नाही तर आपला करायचा प्रश्नच उद्‌भवत नाही तर आता सर्व या ठिकाणी सन्मा. नगरसेवक उपस्थित आहेत आणि प्रक्रिया निवडणुक ही सुरु झालेली आहे. आपण त्याप्रमाणे प्रक्रीया सुरु केलेली आहे तर आपण पुढची प्रक्रीया सुरु करावी ही विनंती.

**नरेंद्र मेहता :-**

साहेब, विषय असा आहे की, आम्ही कुठल्याही निवडणुक प्रक्रीयेला थांबवत नाही. आमचा एक उद्देश आहे की, एक व्यक्ती मतदानापासुन वंचित राहणार आहे आणि कोर्टाने हेही कुठे सांगितले नाही की स्थगिती आहे तिथपर्यंत तुम्ही निवडणुक घेऊन टाका. हे तर एका साईडने झाले काही विशेष कारणासाठी समजा ३०-४० ला झाले असते तर आपण ही प्रक्रीया सुरु केली असती का? कायद्यात तरतुद आहे तर ती आम्हाला दाखवा आणि आपल्याला जो योग्य निर्णय वाटेल तो आम्हाला द्या यासाठी महापालिकेने कोर्टात अर्ज केला होता की, निवडणुक घ्यायची आहे त्याला आपण निर्णय द्यावे असा महापालिकेने सुध्दा अर्ज केलेला आहे सुप्रिम कोर्टात तर त्या कोर्टाने काय निकाल दिला आहे. प्रोसेस चालु ठेवा किंवा थांबवा............

**सुहास रकवी :-**

पिठासीन अधिकारी यांना विनंती आहे की, एकदा ही प्रोसेस चालू झाल्यांनतर कुठल्याही प्रकारे ते थांबवता येत नाही समजा ५ वर्षाने निर्णय लागणार असेल तर ५ वर्ष महापालिकेची निवडणुक ही थांबवता

येईल का? एकदा निवडणुक प्रक्रिया सुरु झालेली आहे. तर त्याचा निर्णय पिठासीन अधिकारी घेतलीच पण जर ५ वर्ष निर्णय लागणार नसेल तर मग तसंच चालु राहणार नाही.

**प्रभात पाटील :-**

नमस्कार, खरं तर महानगरपालिकेने हायकोर्टाला कळविले आहे. ही संपूर्ण निवडणुक प्रक्रिया आहे ती राज्य निवडणुक आयोगाच्या माध्यमातून झालेली आहे त्यामुळे राज्य निवडणुक आयोगाला ह्याच्याविषयीचं गांर्भिय लक्षात यायला पाहिजे. त्यांनी या दृष्टीने आतापर्यंत हा निर्णय लावायला पाहिजे होता. सुप्रिम कोर्टापर्यंत जाऊन आणि तो निर्णय आणायला हवा होता. त्यांनी जर तो आणु शकत नसतील तर त्याच्यामध्ये आम्ही निवडुन आलेले सदस्यांचा किंवा आम्हा लोकांचा काहीही दोष नाही त्यामुळे आज त्यांनीच तुम्हाला अपॉईंट केलेले आहे हे लक्षात घ्या की, राज्य निवडणुक आयोगाकडुन तुम्ही अपॉईंट झाले आहात याचा जर त्यांना ह्याच्यामध्ये कोणत्याही प्रकारचा अडथळा जाणवत नाही तर तुम्हाला विनंती आहे की, तुम्ही तुमचे कामकाज चालु ठेवावे.

**शिवाजीराव दौंड ( पिठासीन अधिकारी) :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या प्रभाग १८/अ मधील जी निवडणुक झालेली आहे. त्या निवडणुकीचा निकाल जाहीर करण्यात येणार नाही. यासाठी तसा कोर्टाचा आदेश आहे. मा. उच्च न्यायालयाचा त्यामुळे इतर मा. सदस्य निवडुन आलेले आहेत त्यामध्ये ही मा. महापौरांची निवडणुक घेण्यामध्ये कोणताही प्रतिबंध नाही तेव्हा ही जी महापौर निवडणुकीची जी प्रक्रीया आहे ती सुरु करण्यात येत आहे.

**नरेंद्र मेहता :-**

साहेब, आमचं म्हणणं तेच आहे की, आता जसं प्रभात ताईने सांगितलं की, आम्ही सर्व निवडुन आले तर आम्ही का वंचित रहावे. आमचं तेच म्हणणं आहे की, ज्या कोणी त्या प्रभागातुन निवडुन येतील त्या निवडुन येणाऱ्या नगरसेविका का वंचित रहावे हा आमचा उद्देश आहे कारण मतदान हा सर्वांचा अधिकार आहे आणि त्यांना वंचित ठेवणं त्यासाठी महापालिकेने कोर्टात अर्ज सुध्दा केला होता की, आम्हाला निकाल द्या त्यावेळी कोर्टाने रुलिंग दिलं नाही की, तुम्ही प्रोसेस चालु ठेवा महापालिकेने स्पेसिफिक केलं होतं की, आमची निवडणुक आहे महापौरांची घ्यायची आहे तर त्यासाठी आपण निर्णय द्यावे मग त्यावर सुप्रिम कोर्टाने अजुन निर्णय कुठे दिला त्यांनी द्यायला पाहिजे होता की, तुम्ही निवडणुक कॅरी फॉरवर्ड करा त्याची आवश्यकता नाही.

**प्रभात पाटील :-**

प्रशासकीय बाब म्हणून आपल्याला अपॉईंट केलेले आहे ते त्यांच्याही लक्षात आले असेल.

**नरेंद्र मेहता :-**

मला वाटतं मा. उच्च न्यायालयापेक्षा जास्त मोठा इथे कोणीही नाही.

**शिवाजीराव दौंड ( पिठासीन अधिकारी) :-**

मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहून त्या प्रभागामधील रिझल्ट डिक्लेअर करायचा नाही बाकीचे जे सन्मा. सदस्य त्यामधुन महापौरांची निवड करण्यासाठी याठिकाणी मला पिठासीन अधिकारी म्हणून पाठवले आहे.

**नरेंद्र मेहता :-**

माझा फक्त एवढा प्रश्न आहे की, महापालिकेने अर्ज केला होता की, आम्हाला निवडणुक प्रक्रिया सुरु करायची आहे आणि तो मतदान त्यांनी करावं तो वंचित राहू नये असं ॲप्लीकेशन केलं होतं. कोर्टाने ते फेटाळलं त्याचा जर कुठलाही निर्णय दिला नाही की, तुम्ही ती निवडणुक कॅरी फॉरवर्ड करा असं कुठे दिलं आहे? महापालिकेने स्पेसिफीक म्हटलं होतं ना की, त्या उमेदवाराला मतदान अधिकार द्यायला पाहिजे. स्पेसिफिक ॲप्लीकेशन म्हटलं होत ना मी आपल्याकडे कुठलेही अर्ज घेऊन येतो की, असं असं आहे तर त्याचा तुम्ही फेटाळता.

**शिवाजीराव दौंड ( पिठासीन अधिकारी) :-**

मा. उच्च न्यायालयाने तो रिझल्ट डिक्लेअर करु नये हा आदेश कायम केलेला आहे. म्हणजे आता जे सन्मा. सदस्य निवडुन आलेले आहेत त्यामधुन महापौरांची निवडणुक घेण्यापासून बंदी घालण्याचा कुठेही हुकुम नाही आहे.

**नरेंद्र मेहता :-**

महापालिकेने स्पेसिफिक ॲप्लीकेशन केलं होतं की, या निवडणुकीसाठी त्यामध्ये कोर्टाने निर्णय दिला नाही. स्पेसिफिक ॲप्लीकेशन केलं होतं की, आम्हाला महापौर पदाची निवडणुक घ्यायची आहे तर त्या उमेदवाराने वंचित राहू नये म्हणून त्याच्यावर आदेश द्यावा तर तसा आदेश कुठे दिला?

**शिवाजीराव दौंड ( पिठासीन अधिकारी) :-**

मा. उच्च न्यायालयामध्ये महापौरांची निवडणुक घेऊ नये, उपमहापौरांची निवडणुक घेऊ नये असा कोणत्याही प्रकारचा आदेश नसल्यामुळे हे आजच्या मा. महासभेमध्ये ही प्रोसिजर चालु राहील हा माझा निर्णय आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मी आपल्याकडे एखाद्या वस्तुसाठी परवानगी मागायला येतो आपण मग ती फेटाळता मग मी जाऊन ते काम करायचं आणि सांगायचं की, कुठे सांगितलं करु नका तुमचा कोर्टाने निर्देशच फेटाळला आपण परवानगीसाठीच गेलेलो त्यानी तो फेटाळला आता मी एखाद्या बिल्डींग परमिशनसाठी जातो आणि ती बिल्डींग परमिशन कमिशनर साहेबांनी फेटाळली तर याच्यामध्ये कमिशनरने नाही कुठे सांगितलं फेटाळली आहे तर मी जाऊन ती बिल्डींग सुरु करु का?

**शिवाजीराव दौंड ( पिठासीन अधिकारी) :-**

याठिकाणी ९४ पैकी एक सन्मा. सदस्यांची निवडणुक स्थगित आहे.

**नरेंद्र मेहता :-**

साहेब, कोणालाही वंचित ठेवता येतो का? ते जरा मला आपण सांगावे जो सन्मा. सदस्य या मिरा भाईंदर मधल्या प्रभाग क्र.१८/अ मधुन निवडुन येत आहे. त्याला आपण वंचित ठेवायचं का?

**जुबेर इनामदार :-**

निवडणुक घेता येत नाही असं कुठे आहे?

**शिवाजीराव दौंड ( पिठासीन अधिकारी) :-**

हे न्यायप्रविष्ठ असल्यामुळे त्यामध्ये ह्याप्रकरणी निर्णय घेण्यात यावा.

**नरेंद्र मेहता :-**

न्यायप्रविष्ठ आहे तर आपण प्रक्रिया कशी सुरु केली? आमचे तेच म्हणणं आहे.

**बर्नट डिमेलो :-**

साहेब, त्यांना जर वाटतं असेल तर री-ईलेक्शन होऊ शकते ना? त्यावेळी त्या सीटचा निकाल लागेल त्यावर रि-ईलेक्शन होईल.

**आसिफ शेख :-**

सन्मा. सदस्य या ठिकाणी रडीचा डाव खेळतात असे मला म्हणायचं आहे याठिकाणी खरं म्हणजे सर्व नवनियुक्त सन्मा. सदस्य आहेत त्या सगळयांचा सर्व प्रथम मी स्वागत करतो. आणि पिठासीन साहेब, मी आपणाला कळवू इच्छितो की, हे सभागृह आहे कोर्ट नव्हे. सभागृहाचा निर्णय हा अंतिम असतो आणि सभागृहाचे पिठासीन अधिकारी म्हणून आपण याठिकाणी निर्देश दिलेला आहे. प्रक्रिया सुरु करा. तर कृपया आपण प्रक्रीया सुरु करावी आणि सन्मा. सदस्यांनी अगोदर अशाप्रकारे जो रडीचा डाव सुरु केलेला आहे. तर तो चुकीचा आहे खरं म्हणजे ते माजी महापौर राहीलेले आहे त्यांना सगळ्यात जास्त अनुभव आहे आणि बिल्डींगच्या बाबतीत तर जास्त अनुभव आहे त्यामुळे हे बिल्डींग संदर्भातला विषय नाही. ह्या शहराचा प्रथम नागरीक आपल्याला निवडुन द्यायचा आहे आणि सन्मा. महापौर यांना निवडुन द्यायचा आहे. त्याठिकाणी असा जर प्रकार करत असतील तर हे चुकीचं आहे. सन्मा. सदस्य नरेंद्र जी मेहता यांना मी विरोधी पक्षनेतासाठी शुभेच्छा देतो कारण त्यांनी येऊन पहिलीच ती खुर्ची माझी पकडलेली आहे विरोधी पक्षनेतेची ती खुर्ची आहे त्यांना शुभेच्छा देतो आणि आपल्याला विनंती करतो की, कृपया आपण महापौर/उपमहापौर निवडणुकीची प्रक्रिया सुरु करावी. धन्यवाद।

**शिवाजीराव दौंड ( पिठासीन अधिकारी) :-**

या मा. महासभेची प्रक्रिया सुरु करण्यात येत आहे.

**निलम ढवण :-**

सन्मा. पिठासीन अधिकारी, प्रत्येक मा. महासभेचे किंवा इथले जे कामकाज आहे. रुल्स ॲन्ड रेग्युलेशन नुसार जर चालत असेल तर या संदर्भात सन्मा. नरेंद्र मेहताजी साहेब यांनी जो विषय मांडलेला आहे त्यांची शंका आपण दुर केली पाहिजे आणि या शंकेचे निरसन होईपर्यंत विरोधी पक्षांनी एवढी घाई करायची काही गरज वाटत नाही.

**शिवाजीराव दौंड ( पिठासीन अधिकारी) :-**

याठिकाणी जे सन्मा. सदस्य या सभागृहामध्ये उपस्थित आहेत. त्यातुन महापौरांची उपमहापौरांची निवडणुक होणार आहे. मा. उच्च न्यायालयाचे जे आदेश आहेत त्या प्रभागातील १८/अ प्रभागातील रिझल्ट डिक्लेअर करु नये एवढं आहे. त्यामुळे या मा. महासभेच्या कामकाजामध्ये कोणत्याही प्रकारची बाधा येत नाही.

**नरेंद्र मेहता :-**

पहिला आदेश वाचला तर दुसरा आदेश वाचाना दुसरा आदेश बघा आपण पहिला आदेश वाचला दुसरा आदेश बघा.

**प्र. नगरसचिव :-**

मा. पिठासीन अधिका-यांच्या परवानगीने सभेच्या कामकाजाला सुरुवात करण्यात येत आहे. या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. विशेष महासभा मंगळवार दि. २८/०८/२०१२ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र. ०१, दि. १७/०८/२०१२

रोजी सोबतच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. प्रकरण क्र.१, मिरा भाईंदर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुक ऑगस्ट २०१२ मध्ये निवडून आलेल्या सदस्यांपैकी एका सदस्यांची मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ कलम १९(१) मध्ये तरतुद केल्याप्रमाणे **''महापौर''** पदावर अडीच वर्षासाठी निवड करणे. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मा. महापौर पदाच्या निवडणुकी करिता दि. २२/०८/२०१२ रोजी दु. ३.०० ते ५.०० या वेळेमध्ये नामनिर्देशन पत्र मागवले असता पुढील एकुण चार उमेदवारांनी आपली आठ नामनिर्देशन पत्र दाखल केलेली आहेत. उमेदवारांची नावे १. श्री. प्रभाकर पद्माकर म्हात्रे २. श्री. भोईर राजू यशवंत ३. श्री. मेहता नरेंद्र लालचंद ४. श्रीम. कॅटलीन ऍन्थोनी परेरा. वरिल सर्व उमेदवारांची नामनिर्देशन पत्रे मा. पिठासीन अधिकारी यांसकडे सुपुर्त करित आहे.

**शिवाजीराव दौंड ( पिठासीन अधिकारी) :-**

प्राप्त आठ नामनिर्देशन पत्राची छाननी केली असता आठ ही नामनिर्देशन पत्र पात्र आहेत. व्हॅलिड आहेत. छाननी अंती श्री. प्रभाकर पद्माकर म्हात्रे, श्री. भोईर राजू यशवंत, श्री. मेहता नरेंद्र लालचंद व श्रीम. कॅटलीन एन्थोनी परेरा (दीदी) यांचे नामनिर्देशन पत्र वैध असल्याचें मी घोषित करित आहे. महापौर पद हे एकच पद असल्याने या पदासाठी एकूण चार उमेदवार आहेत. मी पिठासीन अधिकारी म्हणुन असे सुचित करतो की, ज्या कोणी उमेदवारास आपली उमेदवारी मागे घ्यायची असल्यास त्यांच्याकरिता नियमानुसार नामनिर्देशन पत्र मागे घेण्याकरिता पंधरा मिनिटांचा अवधी देत आहे. ११.४५ पर्यंत हा वेळ देण्यात येत आहे. उमेदवारी मागे घेण्याच्या अवधीमध्ये सन्माननीय सदस्य श्री. भोईर राजू यशवंत व श्री. मेहता नरेंद्र लालचंद यांनी आपली उमेदवारी मागे घेतलेचे अर्ज माझ्याकडे सुपुर्त केले आहे. महापौर पदाच्या निवडणुकीच्यासाठी दोनच उमेदवार आता शिल्लक राहिलेले आहेत. ते याप्रमाणे श्रीम. कॅटलीन ऍन्थोनी परेरा व श्री. प्रभाकर पद्माकर म्हात्रे याच्याकरिता उमेदवारांच्या बाजूने हात वर करुन मतदान घेण्याची प्रक्रिया सुरु करण्यात येत आहे.

**प्र. नगरसचिव :-**

मा. महापौर पदाच्या निवडणुकीसाठी प्रत्येक सदस्यांनी हात वर करुन ज्या उमेदवारांचे नाव पुकारण्यात येईल प्रथमतः त्याच्या बाजूने मतदान करायचे आहे. तर ते हात वर करुन करायचे आहे. त्यांच्या नंतर त्यांच्या विरोधात असतील त्यांनी मतदान करायचे आहे आणि नंतर तटस्थ ह्या प्रमाणे आहे. निवडणुक लढविणाऱ्या प्रत्येक उमेदवारांना मिळालेल्या मतांची संख्या घोषित केल्यानंतर पिठासीन अधिकारी निकाल घोषित करण्याची कार्यवाही करतील. तद्नंतर उमेदवारांनी मिळविलेल्या मतांच्या संख्येनुसार चढत्या क्रमाने उमेदवारांची यादी तयार करतील. ज्या उमेदवाराला जास्त मते पडतील ते उमेदवार रितसर निवडून आल्याचे घोषीत करतील मग ते समसमान मिळाल्यास मा. पिठासीन अधिकारी असे घोषीत करतील की, निवडणूकीचा निकाल चिठ्ठ्या टाकून सोडतीद्वारे सोडविण्यात येईल. उपस्थित आणि मत देण्यास हक्कदार असलेल्या पालिका सदस्य बहुसंख्येने ठरवतील अशा व्यक्तीकडून चिठ्ठी काढण्यात येईल. ज्या उमेदवारांच्या नावाने चिठ्ठी निघेल तो उमेदवार उक्त पदावर वैधरितीने निवडून आले असल्याचे घोषीत करण्यात येईल. त्यानुसार मी आता सर्व प्रथम वर्णानुक्रमे जी नावे उमेदवारांची आहेत. त्या प्रमाणे प्रथम कॅटलीन ऍन्थोनी परेरा यांचे उमेदवारीसाठी ज्या सदस्यांना त्यांच्या बाजूने मतदान करायचे आहे त्यांनी त्यांच्या सदस्यांनी हातवर करायचे. तसेच माईक वरती आपले नाव सांगुन कोणाला मतदान करणार आहे. त्यांच नाव सांगायचे आहे आणि त्याची व्हिडिओ शुटींग देखिल होणार आहे. आणि प्रत्येकाने स्वाक्षरी करायची आहे. प्रथम मी कॅटलिन ऍन्थोनी परेरा यांचे मतदानासाठी नाव पुकारतो. कृपया सदस्यांनी आपल नाव माईकवर बोलायचे आहे. आणि ज्यांना मतदान करायचे आहे त्यांनी त्यांचे नाव बोलायचे आहे. श्रीम. कॅटलिन ऍन्थोनी परेरा यांच्या विरोधात जे असतील त्यांनी हातवर करुन मतदान करायचे आहे. तटस्थ कोणी नाही. तसेच पुढील उमेदवार आपले श्री. प्रभाकर पद्माकर म्हात्रे यांच्या बाजूने ज्यांना मतदान करायचे आहे. त्यांनी हातवर करुन माईकवर आपले नाव सांगायचे आणि स्वाक्षरी करायची. श्री. प्रभाकर पद्माकर म्हात्रे यांच्या विरोधात जे असतील त्यांनी हातवर करुन मतदान करायचे आहे आणि स्वाक्षरी करायची आहे. तटस्थ कोणी नाही. मतदान झालेले आहे. तर मतदानाची आकडेवारी मी मा. पिठासीन अधिकारी यांच्याकडे सुपुर्त करतो.

**शिवाजीराव दौंड ( पिठासीन अधिकारी) :-**

मा. महापौर पदाच्या निवडणुकीसाठी दोन उमेदवार यांना हातवर करुन मतदान घेतले असता श्रीम. कॅटलिन ऍन्थोनी परेरा यांना ५० इतकी मते व श्री. प्रभाकर पद्माकर म्हात्रे यांना ४३ मते मिळाली आहेत. तसेच शुन्य सदस्य तटस्थ राहिले आहेत. या दोन्ही उमेदवारांपैकी सर्वात जास्त मते श्रीम. कॅटलिन ऍन्थोनी परेरा यांना मिळाले आहे. श्रीम. कॅटलिन ऍन्थोनी परेरा ह्या महापौर पदी बहुमताने निवडुन आल्याचे मी जाहिर करत आहे. मा. महापौर पदाचा कालावधी निवडुन आलेल्या तारखेपासुन अडिच वर्षापर्यंत राहिल. यानंतर उपमहापौर पदासाठी निवडणुक प्रक्रिया सुरु होत आहे.

**प्रकरण क्र. ०१ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुक ऑगस्ट २०१२ मध्ये निवडून आलेल्या सदस्यांपैकी एका सदस्याची मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ कलम १९(१) मध्ये तरतुद केल्याप्रमाणे ''महापौर'' पदावर अडीच वर्षासाठी निवड करणे.

**ठराव क्र. ०१ :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ कलम १९(१) मधील तरतुदींनुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या महापौर पदाकरिता निश्चित केलेल्या तारखेस व वेळेस नामनिर्देशन पत्रे मागविली असता एकूण चार उमेदवारांनी नामनिर्देशन पत्रे दाखल केली होती. त्या उमेदवारांची नांवे पुढीलप्रमाणे :-

१) प्रभाकर पद्माकर म्हात्रे
२) भोईर राजु यशवंत
३) मेहता नरेंद्र लालचंद
४) कॅटलीन एन्थोनी परेरा

महापौर पद हे एकच पद असल्याने, या पदासाठी ४ उमेदवार आहेत. म्हणून सभागृहात पिठासिन अधिकारी यांनी ज्या कोणी उमेदवारांस आपली उमेदवारी मागे घ्यायची असल्यास त्यांच्या करिता नियमानुसार नामनिर्देशन पत्र मागे घेण्याकरिता १५ मिनिटांचा अवधी दिला असता **१) श्री. भोईर राजु यशवंत व २) श्री. मेहता नरेंद्र लालचंद** यांनी आपली उमेदवारी मागे घेतल्याचा अर्ज पिठासिन अधिकारी यांचेकडे सुपूर्द केला. **''महापौर''** पदाच्या निवडणुकीसाठी दोनच उमेदवार शिल्लक राहिले. त्यानंतर उमेदवारांच्या बाजूने **''हात वर''** करुन मतदान घेतले असता **१) श्रीम. कॅटलीन एन्थोनी परेरा** यांना **५०** इतकी मते व **२) श्री. प्रभाकर पद्माकर म्हात्रे** यांना **४३** इतकी मते मिळाली. तसेच **०** सदस्य तटस्थ राहिले.

या दोन्ही उमेदवारांपैकी सर्वात जास्त मते **श्रीम. कॅटलीन एन्थोनी परेरा** यांना **जास्त मते** मिळाल्याने **श्रीम. कॅटलीन एन्थोनी परेरा** ह्या **''महापौर''** पदी बहुमताने निवडून आल्याचे मी जाहीर करीत आहे. महापौर पदाचा कालावधी निवडून आल्याचे तारखेपासून अडीच वर्षापर्यंत राहील.

**सही/-**
**पिठासिन अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र.२, मिरा भाईंदर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुक माहे ऑगस्ट २०१२ मध्ये निवडून आलेल्या सदस्यांपैकी एका सदस्यांची मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ कलम १९(१) मध्ये तरतुद केल्याप्रमाणे **''उपमहापौर''** पदावर अडीच वर्षासाठी निवड करणे. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मा. उपमहापौर पदासाठी निवडणुकीकरिता दि. २२/८/२०१२ रोजी दु. ३.०० ते सायं. ५.०० या वेळेमध्ये नामनिर्देशन पत्र मागवले असता पुढील एकुण चार उमेदवारांनी आपले नऊ नामनिर्देशन पत्र दाखल केलेली आहेत. उमेदवारांची नावे **१. श्री. प्रविण मोरेश्वर पाटील २. श्री. जाधव मोहन महादेव ३. श्री. शरद केशव पाटील ४. श्रीम. सय्यद नुरजहाँ नझर हुसेन** वरील सर्व उमेदवारांची नामनिर्देशन पत्रे मा. पिठासीन अधिकारी यांच्याकडे सुपुर्त करित आहे.

**शिवाजीराव दौंड ( पिठासीन अधिकारी) :-**

मा. उपमहापौर पदासाठी ९ नामनिर्देशन पत्राची छाननी केली असता सर्व वैध असल्याचे आढळून आले छाननी अंती **श्री. प्रविण मोरेश्वर पाटील, श्री. जाधव मोहन महादेव, श्री. शरद केशव पाटील व श्रीम. सय्यद नुरजहाँ नझर हुसेन** यांचे नामनिर्देशन पत्र वैध असल्याचे मी घोषित करत आहे. उपमहापौर पद हे एकच असल्याने या पदासाठी एकुण चार उमेदवार आहेत. तर मी पिठासीन अधिकारी म्हणुन असे सुचित करतो की, ज्या कोणी उमेदवारास आपली उमेदवारी मागे घ्यावयाची असल्यास त्यांच्याकरिता नियमानुसार नामनिर्देशन पत्र मागे घेण्याकरिता पंधरा मिनिटांचा अवधी देण्यात येत आहे. हा कालावधी १२.४५ पर्यंत राहिल. उमेदवारी मागे घेण्याच्या अवधीमध्ये श्री. प्रविण मोरेश्वर पाटील व श्री. जाधव मोहन महादेव यांनी आपली उमेदवारी मागे घेतल्याचे अर्ज माझ्याकडे सुपुर्त केले आहेत. उपमहापौर पदासाठी नामनिर्देशन पत्र दाखल केलेल्या उमेदवारांची अंतिम यादी याप्रमाणे आहे. श्रीम. सय्यद नुरजहाँ नझर हुसेन, श्री. शरद केशव पाटील. मतदानाची प्रक्रिया सुरु करण्यात येत आहे.

**प्र. नगरसचिव :-**

उपमहापौर पदासाठी दोन उमेदवार अंतिमतः रिंगणात आहेत. ते वर्णानुक्रमे प्रथमतः श्रीम. सय्यद नुरजहाँ नझर हुसेन यांच्या बाजुने ज्यांना मतदान करायचे त्यांनी हातवर करुन मतदान करायचे आणि आपल नाव माईकवर सांगुन मतदान केल्याचे घोषित करायचे आहे. श्रीम. सय्यद नुरजहाँ नझर हुसेन उपमहापौर पदासाठी यांच्या विरोधात ज्यांना मतदान करायचे असतील त्यांनी हातवर करायचे आहे तटस्थ कोणी नाही. तर दुसरे उमेदवार श्री. शरद केशव पाटील यांच्या बाजूने उपमहापौर पदासाठी ज्यांना मतदान करायचे त्यांनी

हातवर करायचे. आपले नाव सांगायचे आणि मतदान केल्याचे घोषित करायचे. उपमहापौर पदासाठी श्री. शरद केशव पाटील यांच्या विरोधात ज्यांना मतदान करायचे असतील त्यांनी हात वर करायचे आहे. तटस्थ कोणी नाही. तर मतदानाची आकडेवारी मी मा. पिठासीन अधिकारी यांच्याकडे सुपुर्त करतो.

**शिवाजीराव दौंड ( पिठासीन अधिकारी) :-**

उपमहापौर पदाच्या अंतिम यादीतील उमेदवारांना त्यांच्याबाजुने हातवर करुन मतदान घेतले असता श्रीम. सय्यद नुरजहाँ नझर हुसेन यांना ५० इतकी मते मिळाली आहेत व श्री. शरद केशव पाटील यांना ४३ इतकी मते मिळाली आहेत. तसेच शुन्य इतके सदस्य तटस्थ राहिले आहेत. या दोन्ही उमेदवारांपैकी सर्वात जास्त मते श्रीम. सय्यद नुरजहाँ नझर हुसेन यांना मिळाल्याने या उपमहापौर पदी बहुमताने निवडुन आल्याचे मी जाहिर करतो. उपमहापौर पदाच्या कालावधी निवडुन आल्याच्या तारखेपासुन अडिच वर्षापर्यंत राहील.

**प्रकरण क्र. ०२ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुक माहे ऑगस्ट २०१२ मध्ये निवडून आलेल्या सदस्यांपैकी एका सदस्यांची मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ कलम १९(१) मध्ये तरतुद केल्याप्रमाणे ''उपमहापौर'' पदावर अडीच वर्षासाठी निवड करणे.

**ठराव क्र. ०२ :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ कलम १९(१) मधील तरतुदींनुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या उपमहापौर पदाकरिता निश्चित केलेल्या तारखेस व वेळेस नामनिर्देशन पत्रे मागविली असता एकूण चार उमेदवारांनी नामनिर्देशन पत्रे दाखल केली होती. त्या उमेदवारांची नांवे पुढीलप्रमाणे :-

१) प्रविण मोरेश्वर पाटील
२) जाधव मोहन महादेव
३) शरद केशव पाटील
४) सय्यद नुरजहॉं नझर हुसेन

उपमहापौर पद हे एकच पद असल्याने, या पदासाठी ४ उमेदवार आहेत. म्हणून सभागृहात पिठासिन अधिकारी यांनी ज्या कोणी उमेदवारांस आपली उमेदवारी मागे घ्यायची असल्यास त्यांच्या करिता नियमानुसार नामनिर्देशन पत्र मागे घेण्याकरिता १५ मिनिटांचा अवधी दिला असता **१) श्री. जाधव मोहन महादेव व २) श्री. प्रविण मोरेश्वर पाटील** यांनी आपली उमेदवारी मागे घेतल्याचा अर्ज पिठासिन अधिकारी यांचेकडे सुपूर्द केला. **''उपमहापौर''** पदाच्या निवडणुकीसाठी दोनच उमेदवार शिल्लक राहिले. त्यानंतर उमेदवारांच्या बाजूने **''हात वर''** करुन मतदान घेतले असता **१) श्रीम. सय्यद नुरजहॉं नझर हुसेन** यांना **५०** इतकी मते व **२) श्री. शरद केशव पाटील** यांना **४३** इतकी मते मिळाली. तसेच **०** सदस्य तटस्थ राहिले.

या दोन्ही उमेदवारांपैकी सर्वात जास्त मते यांना **जास्त मते** मिळाल्याने **श्रीम. सय्यद नुरजहॉं नझर हुसेन** ह्या **''उपमहापौर''** पदी बहुमताने निवडून आल्याचे मी जाहीर करीत आहे. उपमहापौर पदाचा कालावधी निवडून आल्याचे तारखेपासून अडीच वर्षापर्यंत राहील.

**सही/-**
**पिठासिन अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

नवनिर्वाचित मा. महापौर आणि मा. उपमहापौर यांनी कृपया डायसवर यायचे आहे.

**शिवाजीराव दौंड ( पिठासीन अधिकारी) :-**

(शिवाजीराव दौंड पिठासीन अधिकारी यांनी नवनिर्वाचित महापौर मॅडम यांना पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले. तसेच मा. उपमहापौर मॅडम यांना पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले.) आजची सभा संपल्याची मी जाहीर करतो.

**सभा संपल्याची वेळ :- दुपारी १.३० वा.**

**सही/-**
**पिठासीन अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**